जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

12 JUN 2022

पुढारी

शिवाजी विद्यापीठ प्रवेश परीक्षेला १७४८ विद्यार्थी

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठातर्फे पदव्युत्तर अभ्यासक्रम प्रवेशासाठी पदव्युत्तर प्रवेश परीक्षेतंर्गत शनिवारी विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षा झाल्या. १८४८ पैकी १७४८ विद्यार्थांनी परीक्षा दिली. विद्यापीठातील विविध अधिविभाग तसेच सलंग्नित महाविद्यालयामध्ये शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील पदव्युत्तर अभ्यासक्रम प्रवेशासाठीची पदव्युत्तर प्रवेश परीक्षांना सुरुवात झाली आहे. कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर व बेळगाव जिल्ह्यातील १६ परीक्षा केंद्रावर आयोजित केली आहे. शनिवारी (दि. ११) एम.एस्सी. ॲग्रो केमिकल अँड पेस्ट मॅनेजमेंट, नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी, बॉटनी, इलेक्ट्रॉनिक्स, स्टॅटिस्टिक्स, कॉम्प्युटर सायन्स, एम.एसएस्सी., एम.ए.-मास कम्युनिकेशन, एमसीए, बी.जे., एम.जे., बी.लिब या अभ्यासक्रमाच्या परीक्षा झाल्या. रविवारी (दि. १३) प्रवेश परीक्षेचा शेवटचा दिवस आहे.

तरुण भारत

पदव्युत्तर प्रवेशपूर्व परीक्षेला प्रारंभ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेशपूर्व परीक्षेला शनिवारी प्रारंभ झाला. ही परीक्षा १८४८ पैकी १७४८ विद्यार्थ्यांनी दिली. नवीन शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील प्रवेशासाठी ही परीक्षा झाली. विद्यापीठातील विविध अधिविभाग, संलग्नित महाविद्यालयातील पदव्युत्तर प्रवेशासाठी परीक्षांना प्रारंभ झाला आहे. कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील १६ केंद्रांवर परीक्षा घेण्यात आली. एम. एस्सी., ॲग्रो केमिकल ॲंड पेस्ट मॅनेजमेंट, नॅनो सायन्स ॲंड टेक्नॉलॉजी, बॉटनी, इलेक्ट्रॉनिक्स, स्टॅस्टिक्स, कॉम्प्युटर सायन्स, एम. एस्सी., एम. ए. मास कम्युनिकेशन, एमसीए, बी. जे., एम. जे., बी. लिब., सायन्स ॲंड इन्फरमेशन सायन्स, एम. टेक-रूरल टेक्नॉलॉजी या अभ्यासक्रमाच्या परीक्षा झाल्या. रविवार १२ जून रोजी प्रवेशपूर्व परीक्षेचा शेवटचा दिवस आहे.